चिखली पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड, आयुक्तालय
पत्ता:-सर्व्हे नं.७७४, एस.टी.पी. बिल्डींग, सी-विंग,
पुर्णानगर,चिंचवड पुणे-४११०१९
दुरध्वनी क्र.०२०-२७४९२५२५, ई-मेल-
pschikhali.pcpc-mh@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जावक क्रमांक/ /२०२२ दिनांक :- /०७/२०२२

## प्रेस नोट

चिखली पोलीस ठाणे येथे दाखल असलेला गुन्हा रजि.नंबर ३८५/२०२१ भादविक ३०२,४५७,३४ मधील पाहीजे असलेला आरोपी नामे अल्लाऊद्दीन सिराजऊद्दीन राईन,वय- २९ वर्ष रा.पिंपळाच्या झाडाजवळ,ओटा स्कीम,निगडी,पुणे मुळ रा.थाना बहादपुर तहसिल नगीना जिला बिज़नोर राज्य उत्तरप्रदेश याने त्याचे साथीदारांसह मिळुन कट रचुन महिला नामे कमल बाबुराव खानेकर/नुरजहॉ अजिज कुरेशी,वय-५६ वर्ष रा.हरगुडेवस्ती,चिखली पुणे हिला दिनांक ०४.०८.२०२१ रोजी रात्री १२.०० वाजण्याचे सुमारास तिच्या राहते घरी तिचा खुन करुन तिच्या घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम घेवून साथीदारांसह फरार झाला होता.काही दिवसापुर्वी त्यांचेपैकी चार आरोपींचा शोध घेवून त्यांना ताब्यात घेवून अटक केलेली आहे.वरील नमुद आरोपी हा गुन्हा घडल्यापासुन फरार होता व तो मिळुन येत नव्हता.गुन्हयाचे तपासा दरम्यान आरोपी हा उत्तरप्रदेश राज्यामधील मुळ गावी तसेच दिल्ली या भागामध्ये असल्याची गोपनिय माहिती मिळालेली होती.त्यानंतर दिनांक २८.०७.२०२२ रोजी आरोपी हा आनंदनगर,चिंचवड,पुणे येथील झोपडपट्टी परिसरामध्ये येणार असल्याची माहिती सहा.पोलीस निरीक्षक गुमाने,यांना मिळालेली होती.चिखली पोलीस ठाणेकडील तपास पथकाचे अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक गुमाने,पोलीस हवालदार सावंत,पोलीस हवालदार शिंदे,पोलीस हवालदार गर्जे,पोलीस नाईक चोरगे,पोलीस नाईक पिंजारी,पोलीस नाईक राठोड,पोलीस अंमलदार सपकाळ,पोलीस अंमलदार आठरे यांनी दिनांक २८.०७.२०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजल्यापासुन आनंदनगर झोपडपट्टी परिसरामध्ये सापळा लावुन तसेच दाट लोकवस्ती,अरुंद रस्ते,गल्ली बोळामधुन आरोपीचा शोध घेत असताना तेथील प्रचंड अडचणींना सामोरे जावे लागले.तसेच परिसरामधील काही स्थानिक नागरिकांनी देखील आरोपी याचा शोध घेण्यास मदत केलेली आहे.आरोपी याचा शोध घेत असताना रात्री १०.३५ वाजण्याचे सुमारास सदरचा आरोपी हा एका लहान खोलीमध्ये लपुन बसलेला असल्याचे त्यास ओळखुन ताब्यात घेतलेले आहे.तसेच त्याचेकडे तपास करुन त्यास गुन्हयामध्ये अटक करण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी श्री.अकुंश शिंदे साहेब,पोलीस आयुक्त,श्री.संजय शिंदे साहेब,अपर पोलीस आयुक्त,श्री.आनंद भोईटे,पोलीस उपआयुक्त,परिमंडळ-२,श्री.नंदकुमार भोसले पाटील साहेब,सहा.पोलीस आयुक्त,देहुरोड विभाग व श्री.वसंतराव बाबर,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,चिखली पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आलेली आहे.गुन्हयाचा तपास वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली श्री.वसंतराव बाबर,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,चिखली पोलीस ठाणे हे करीत आहेत.

(वसंतराव बाबर)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
चिखली पोलीस स्टेशन पिं.चिं.

Scanned with CamScanner